
# प्राचीन भारतातील ज्ञानवैभव

(Knowledge Splendor in Ancient India)

संपादक
डॉ. महादेव गव्हाणे



## ५.

# अश्मयुगीन मानवाचे कलादालन - प्रागैतिहासिककालीन भारतीय चित्रकला

**लेफ्ट. डॉ. अर्चना टाक**
सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

---

मानवाला लेखनकला अवगत होण्यापूर्वीचा कालखंड म्हणजे प्रागैतिहासिक कालखंड होय. या काळात धातूंचा शोध लागलेला नव्हता. दगडी हत्यारांचाच वापर केला जात असे. म्हणून या काळाला अश्मयुग असे म्हणतात. या काळातील मानवाची निर्मिती म्हणजे प्रामुख्याने दगडी हत्यारे होत. पुराणाश्मयुग, मध्यपाषाणयुग व नवाश्मयुग या तीन कालखंडात प्रागैतिहासिक काळाचे विभाजन केले जाते. प्रागैतिहासिक काळापासून आजपर्यंत अन्न हिच मानवाची मुख्य गरज राहिलेली आहे. पुराणाश्मयुग व मध्यपाषाणयुगात अन्न मिळविण्यासाठी मानवास भटकंती करावी लागत होती. गेंडा, अस्वल, हरिण, गवे, सांबर या प्राण्यांची शिकार तो करत होता. निवाऱ्यासाठी डोंगर-दऱ्यातील कडे कपारी, नैसर्गिक गुहा यांचा वापर तो करत होता. त्यामुळे प्राण्यांची शिकार हेच त्याच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन होते. त्यासाठी या काळातील मानवाने हत्यारे निर्माण केली. पुराणाश्मयुगाच्या शेवटी-शेवटी लहान व चपळ प्राण्यांच्या संख्येत वाढ झाली. परिणामतः हत्यारे व शिकारीच्या तंत्रातही मानवाने बदल केला. मध्यपाषाणयुग हा मानवी प्रगतीतील महत्वाचा टप्पा होता. अग्नीचा शोध हे या काळाचे महत्वाचे वैशिष्ट्य होय. या काळातील मानव दगडाची घरे बांधुन समुहजीवन जगु लागला. आपले जीवन, आपल्या भावना, आपले विचार तो चित्रांमधुन व्यक्त करु लागला. प्रागैतिहासिक काळात मानवाला लेखनकला अवगत नसल्याने या काळातील मानवाने बनविलेली दगडी हत्यारे व गुहाचित्रे यांच्या आधारेच आपल्याला या काळाचा इतिहास समजतो.

कलेच्या अनेक प्रकारांपैकी एक प्रकार म्हणजे चित्रकला होय. पुराणाश्मयुगापासुन मानवाला चित्रकला अवगत होती. या काळातील मानवाने निसर्गनिर्मित गुहांच्या भिंतींवर चित्रे काढली. म्हणजेच चित्रकलेचा प्रवास हा पुराणाश्मयुगातील गुहाचित्रांपासुन सुरु झालेला



आहे. जगातील पहिले चित्रकार हे अश्मयुगात होऊन गेले. लिखाणाची कला अस्तित्वात नसल्याने त्या चित्रकारांची नावे कोणालाच माहित नाहीत. परंतु पुढच्या कित्येक पिढयांना मार्गदर्शक ठरतील अशी चित्रे गुहांच्या भिंतींवर काढुन त्यांनी अजरामर केली आहेत. ती चित्रे पाहताना मन व बुद्धी दोन्ही स्तिमीत होते.

अश्मयुगीन मानवाने रेखाटलेल्या शैलचित्रांसाठी प्रसिद्ध असलेल्या निसर्गनिर्मित गुहा भारतात एकूण १५० ठिकाणी आढळतात. यातील बहुतेक गुहा या मध्य भारतात आहेत. आदमगड, रायगड, जोगीमारा, होशंगाबाद, सिंगनपुर, भीमबेटका, लिखुनिया, भलदारिया ही ठिकाणे प्रागैतिहासिककालीन शैलचित्रांसाठी प्रसिद्ध आहेत. मध्यप्रदेशातील भीमबेटका हे ठिकाण अश्मयुगीन गुहाचित्रांसाठी जगप्रसिद्ध आहे. उज्जैनच्या विक्रम विद्यापीठातील पुरातत्व अभ्यासक डॉ. व्ही. एस. वाकणकर हे १९५७ मध्ये उज्जैन ते भोपाळ या दरम्यान प्रवास करत असताना त्यांना भीमबेटक्याचे डोंगर दिसले. त्या डोंगरांचा शोध घेत-घेत ते भोपाळपर्यंत व भोपाळपासून दक्षिणेकडे ४५ किलोमीटर अंतरावर भीमबेटका येथे जाऊन पोहोचले. भीमबेटक्याच्या सात डोंगरांमध्ये त्यांना एकूण ६५० नैसर्गिक गुहा सापडल्या. १९५८ ते १९७४ या काळात त्यांनी या सर्व गुहा स्वच्छ करून त्यातील अश्मयुगीन गुहाचित्रांवर आपले संशोधन सादर केले आणि तिथुन पुढे अश्मयुगीन मानवाचे हे कलादालन सर्वांसाठी खुले झाले. या ६५० गुहांपैकी ४०० गुहांमध्ये अश्मयुगीन मानवाने काढलेली रंगीत चित्रे आहेत. या जागतिक आश्चर्यांच्या शोधासाठी भारत सरकारने १९७५ या वर्षी डॉ. वाकणकर यांना देशातील चौथ्या क्रमांकाचा नागरी सन्मान पद्मश्री देऊन सन्मानित केले आहे. युनेस्कोने २००३ यावर्षी भारतातील या भीमबेटका येथील अश्मयुगीन मानवाच्या कलादालनाचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केला आहे.

अश्मयुगीन मानवाला कलेच्या चित्रकला या अंगाची माहिती होती. तो शिल्पकार अथवा स्थापत्यविशारद नव्हता. त्याने मूर्तीची व वास्तूंची निर्मिती केली नाही. त्याचे निवासस्थान असलेल्या गुहा ह्या नैसर्गिक होत्या. चित्रकलेची निर्मिती ही साधारणपणे घर सजावटीसाठी, भावनांच्या प्रकटीकरणासाठी, विरंगुळा म्हणून केली जाते. परंतु यापैकी कोणताही उद्देश अश्मयुगीन मानवाच्या चित्रकला निर्मितीला लागू पडत नाही.

अश्मयुगीन मानवाने ही चित्रे एकांत स्थळी, गुहांच्या अंधाऱ्या भागात काढलेली आहेत. सजावटीसाठी ही चित्रे काढण्याचा उद्देश असता तर ती गुहेच्या दर्शनी भागात काढली असती. आपल्या मनातील भावना इतरांना कळाव्यात, हाही उद्देश ही चित्रे काढण्यामागे नसावा. कारण तसे जर या काळातील मानवाला वाटत असते तरती चित्रे त्याने सर्वांना दिसतील अशा गुहेच्या पुढच्याच भागात काढली असती. परंतु त्याने चित्रांसाठी निवडलेली

जागा ही गुहेच्या आतमध्ये असून ती कोणालाच दिसणार नाहीत, याची दक्षता त्याने घेतलेली आहे. सर्वांत महत्वाचे म्हणजे या अश्मयुगीन मानवाने सर्वच गुहांमध्ये चित्रे काढलेली नाहीत. काही ठराविक गुहांतच ती काढलेली आहेत. या काळातील मानवाची प्रतिमेवर खूप श्रद्धा होती. त्याच्या मते, मुळ वस्तु व प्रतिमा यांत काही फरक नव्हता. प्राण्याचे चित्र काढुन त्यात तो जखमी झालेला किंवा मृत झालेला दाखविला तर प्रत्यक्षात तशी शिकार आपल्याला मिळेल, असा विश्वास त्याला वाटत होता. ही चित्रे ठराविक जागेत काढली तरच ती फलदायी होतात, अशी त्याची श्रद्धा असल्यानेच त्याने ती विशिष्ट गुहांमध्येच व त्यातही त्या गुहांतील काही विशिष्ट जागीच ती काढली आहेत.

अश्मयुगीन चित्रकारांनी गुहांच्या भिंतींवर व छतावर चित्रे काढलेली आहेत. ही चित्रे काढण्यासाठी त्यांनी ब्रश म्हणून खारीच्या शेपट्या, मऊ लाकूड तसेच हाताची बोटे यांचा वापर केलेला आहे. या काळातील चित्रांमध्ये २१ प्रकारच्या रंगछटा वापरलेल्या आढळतात. लाल व पांढरा या रंगांचा वापर सर्वात अधिक प्रमाणात केलेला आहे. या काळातील मानव रंग बनविण्यासाठी खनिजांचा वापर करत असे. हिमेटाईट पासून लाल रंग बनवत असे. गेरु, चालस्डोनी यांपासून हिरवा तर चुनखडी पासून पांढरा रंग बनवत असे. अश्मयुगीन मानव हे रंग प्राण्यांची चरबी व झाडपाल्याचा रस यांत कालवुन वापरत होता.

या काळातील मानव ज्या प्राण्यांची शिकार करत असे, तेच प्राणी त्याने चित्रांमध्ये काढलेले आहेत. मानवाच्या दैनंदिन जीवनातील प्रसंगांवर आधारित चित्रे फार कमी आहेत. यातून हे सूचित होते, की, त्याने विरंगुळा म्हणुन चित्रे काढलेली नाहीत. या अश्मयुगीन चित्रकला दालनातून खालील गोष्टी दिसुन येतात.

१. या काळातील मानव शिकारीसाठी समूहा-समूहाने फिरत होता.
२. हिंस्त्र प्राण्यांना पकडण्यासाठी सापळे व विणलेले दोर यांचा वापर करत होता.
३. प्राण्यांची चित्रे हुबेहुब रेखाटण्याकडे या मानवाचा कल दिसून येतो.
४. प्राण्यांची चित्रे मोठी व त्या तुलनेत माणसांची चित्रे लहान आहेत. म्हणजेच प्राण्यांच्या चित्रांना जास्त महत्त्व दिले आहे.

काही ठिकाणी प्राण्यांच्या चित्रांमध्ये आरपार दिसणारे अनेक तपशिलही पाहायला मिळतात. उदा. हरिणाच्या पोटात हरिण किंवा भुकेले हरिण दाखविताना पोटाचा भाग पूर्ण रिकामा दाखविलेला आहे. कदाचित एक्स रे चा शोध पुढे जाऊन मानवाला यांतुनच लागला असावा. अश्मयुगीन मानवाचे हे चित्रकलादालन पाहताना आपल्याला काळाचा विसर पडतो. आपल्याला प्रागैतिहासिक काळात घेऊन जाण्याची ताकद या चित्रांमध्ये आहे. शिलाखंड हाच कॅनव्हास असणारी ही चित्रे म्हणजे वन्यप्राण्यांचे अचल म्हणजेच न हालणारे



संग्रहालयच आहे.

संदर्भ -


१. श्रीवास्तव बृजभूषण, प्राचीन भारतीय प्रतिमा विज्ञान एवं मूर्तिकला, वाराणसी विश्वद्यालय प्रकाशन, १९९०.
२. कळारे अनिल, भारतीय कलेचा इतिहास, सुधीर प्रकाशन, वर्धा, मे २०१०.
३. कळारे अनिल व साखरे विजया, भारतीय कला आणि वास्तुकला, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००५.
४. शहाणे श्री. ह. अंधारे श्री. कृ. व गांगल ग. आ., कला रसग्रहण, गांगल पब्लिकेशन्स, मुंबई, १९६८.
५. सालिवे रा. रा., प्राचीन भारतीय कला इतिहास व रुपदर्शन.
६. सातवळेकर र. ना. कलेचा इतिहास.
७. जगताप जयप्रकाश, भारतीय कलेचा इतिहास.


+++